# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३ / फाल्गुन २९, १९४४ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(२)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(५)** | **शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४७**

---

### राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत

**(१) * १७१२७ श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, श्री.किशोर दराडे : तारांकित प्रश्न क्रमांक १६१६० ला दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शैक्षणिक संस्थांना सद्य:स्थितीत ५ व्या वेतन आयोगानुसार वेतनेतर अनुदान मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००८ मध्ये १००% अनुदानावर आलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत अद्याप कार्यवाही झाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोविड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे नवीन शाळा सुरु होताना सॅनिटेशन, तापमान मोजणे, सॅनिटायझर यासाठी पुरक वेतनेतर अनुदान मंजूर करणे आवश्यक असल्याने या शैक्षणिक संस्थांना वेतनेतर अनुदान देताना ७ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीवर अनुदान मिळावे, अशी सातत्याने मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीत काय आढळून आले, तदनुसार राज्यातील सन २००८ मध्ये १००% अनुदानावर आलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना ७ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीवर वेतनेतर अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) ७ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीवर आधारीत वेतनेतर अनुदान मिळण्याबाबत मागणी आहे.

(४) व (५) राज्यातील खाजगी अनुदानित शाळा चालविणाऱ्या संस्थांना शासन निर्णय, दिनांक १९/०१/२०१३ अन्वये, दिनांक १ एप्रिल, २००८ रोजी वेतन अनुदानावर असलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सन २००८ या वर्षी पाचव्या वेतन आयोगानुसार ज्या टप्प्यावर वेतन अनुदान अनुज्ञेय होते, त्या टप्प्यावरील देय वेतन अनुदानास गोठवून त्यांच्या पाच टक्के प्रमाणे वेतनेत्तर अनुदान (४ टक्के वेतनेत्तर अनुदान व १ टक्का इमारत भाडे/ देखभाल अनुदान) दिनांक १ एप्रिल, २०१३ पासून उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा सुधारीत प्रस्ताव आयुक्त (शिक्षण) यांचेकडून मागविण्यात आला आहे.

-----------------

## मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत

**(२) * १७२४८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सचिन अहिर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.महादेव जानकर, श्री.राजहंस सिंह, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गत १२ वर्षांपासून अपूर्णावस्थेत असल्याने रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएसआय) कामावर मा.उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौपदरीकरणाच्या नावाखाली मुंबई गोवा महामार्गाच्या कामाची दुरुस्तीअभावी दुरवस्था झाली असल्यामुळे रायगड जिल्ह्यात गेल्या दहा वर्षात तब्बल ३००० च्या जवळपास प्रवाशांचे बळी गेले असून या महामार्गाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत कोकण जन आक्रोश समितीने राज्य शासनास माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पळस्पे पासून ते महाड-पोलादपूर पर्यंत ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांनी अपघातांची संख्या वाढली असताना वाहन चालकांच्या चुका दुर्घटनांना कारणीभूत असल्याचे सांगितले जाते, तसेच वडखळ, नागोठणे, कोलाड, माणगाव तसेच महाड, पोलादपूर या भागात आजही संथ गतीने सुरू असलेल्या कामाने वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खड्डे भरण्यासंदर्भांत दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यास राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचआय) अपयशी ठरल्याने सदर काम माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असतानाही अद्यापपर्यंत सदर महामार्गाचे काम पूर्ण झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई-गोवा चौपदरीकरणाचे काम रखडण्याची कारणे काय आहेत व सदर काम पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) वाहतूक कोंडी होत असल्याची बाब खरी आहे.

तथापि, पनवेल (पळस्पे) ते कासु (कि.मी.० ते कि.मी.४२) दरम्यानचे खड्डे ९० टक्के भरण्यात आलेले आहेत, तसेच सेवा रस्त्यांचे व मुख्य रस्त्यांच्या काँक्रीटीकरण करण्याच्या कामाची निविदा स्विकृती झालेली आहे. कासु ते इंदापूर (कि.मी.४२ ते कि.मी.८४) या रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) हे अंशत: खरे आहे. खड्डे भरण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) पनवेल ते इंदापूर ८४ कि.मी. महामार्गाची लांबी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येते. सदर लांबीतील चौपदरीकरणासाठी बी.ओ.टी तत्वावर नेमलेल्या सवलतदारास टर्मिनेट केल्यानंतर सदर सवलतदार यांनी मा.उच्च न्यायालय, दिल्ली येथे आव्हान दिले होते. त्या दाव्यास मा.उच्च न्यायालयाने खारीज केले.

पनवेल ते कासु या लांबीसाठी काँक्रीटीकरण करण्याच्या कामाची निविदा स्विकृत झाली आहे. कासु ते इंदापूर लांबीसाठी सिमेंट काँक्रीटीकरणाचे चौपदरीकरणाच्या कामास नोव्हेंबर, २०२२ मध्ये कंत्राटदारास कार्यारंभ आदेश दिलेला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील इंदापूर ते झाराप या लांबीतील ८०-९० टक्के जागा ताब्यात आल्यानंतर प्रत्यक्ष काम सन २०१७-१८ मध्ये सुरु झाले. यामध्ये भूसंपादन प्रक्रिया, प्रलंबित भूसंपदान वाटप व वनजमिनीची प्रलंबित मंजूरी, कोविड-१९ च्या निर्बंध इ. मुळे कामाची गती राखणे शक्य न झाल्याने कामास विलंब झाला आहे. सद्य:स्थितीत नोव्हेंबर, २०२२ मध्ये वन जमिनीची स्टेज-१ परवानगी प्राप्त झाली असून भूसंपादन मोबदला वाटप प्रक्रिया केंद्र शासनाच्या भूमीराशी पोर्टलमार्फत प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत विभागाच्या अखत्यारितील ३६६ कि.मी. लांबीपैकी २४५ कि.मी. लांबीचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. केंद्र व राज्य शासनातर्फे सदर महामार्गाचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने वारंवार बैठका घेण्यात येवून कामातील अडचणी दूर करण्यात येवून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

-----------------

## मुंबईमध्ये बनावट गोळ्या आणि इंजेक्शन्सची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३) * १७७४० श्री.अंबादास दानवे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवी शरीरात लोहाचे प्रमाण वाढविण्यासाठी विकल्या जाणाऱ्या गोळ्या आणि इंजेक्शन्स बनावट असल्याची तक्रार आल्यानंतर अन्न आणि औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईत मुंबईत अशी बनावट इंजेक्शन्सची सर्रास विक्री केली जात असल्याचे दिनांक ०९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मुंबईत अन्न व औषध विभागाने एकूण किती कंपन्यांवर छापे टाकले असून किती रुपयांची बनावट इंजेक्शन्स आणि गोळ्यांचा साठा जप्त केला आहे, तसेच बनावट इंजेक्शनमुळे भविष्यात राज्यात निष्पाप नागरिकांचे बळी जाऊ नयेत, याकरिता शासनाकडून कोणत्या खबरदारीची उपाययोजना हाती घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, मुंबईतील सैफी रुग्णालयात रक्तातील तांबड्या पेशींची कमतरता झालेल्या एका रुग्णाचा बनावट इंजेक्शन दिल्याने मृत्यू झाल्याप्रकरणी अन्न व औषध विभागाने जप्त केलेल्या इंजेक्शनच्या नमुन्यांबाबत पुण्यातील प्रयोगशाळेने दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी दिलेल्या अहवालानुसार सदरहू इंजेक्शन बनावट आणि अप्रमाणित असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बनावट इंजेक्शनप्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाने मुंबई पोलिसांकडे केलेल्या तक्रारीनंतर १२ औषध विक्रेते आणि वितरकांविरोधात व्ही.पी. रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने बनावट इंजेक्शन देणाऱ्या रुग्णालयासह १२ औषध विक्रेते व पुरवठा करणारे वितरक व संबंधित दोषी कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे अंशत: खरे आहे.

सैफी रुग्णालय, मुंबई या रुग्णालयात झालेल्या दुर्घटनेबाबत अन्न व औषध प्रशासनाकडे दिनांक ०४/११/२०२२ रोजी ईमेलद्वारे तक्रार प्राप्त झाली होती. तक्रारदाराने सैफी रुग्णालय, मुंबई येथे Orofer FCM Injection (शरीरात लोहाचे प्रमाण वाढविण्यासाठीचे इंजेक्शन) या इंजेक्शनमुळे रिॲक्शन येऊन एका रुग्णाचा मृत्यू झाल्याचे कळविले आहे.
(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून एकूण १२ औषध विक्रेत्यांविरुध्द व्ही.पी. रोड पोलीस स्टेशन गिरगाव, मुंबई येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर औषधाचा रुपये १०,५००/- इतक्या किंमतीचा साठा प्रतिबंधित केला आहे.
(३) व (४) खरे आहे.
(५) व्ही.पी.रोड पोलीस स्टेशन, गिरगांव, मुंबई आणि अन्न व औषध प्रशासनाकडून भा.दं.वि. कलम ४२०,४६४, ४६८, ४७१, ४७३ नुसार तसेच औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ अंतर्गत कलम १७(B) नुसार दिनांक ०७/०१/२०२३ रोजी एकूण १२ औषध विक्रेत्यांविरुध्द एफ.आय.आर. नोंदविण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणांत दिनांक १०/०२/२०२३ रोजी एकूण ०३ आरोपींना अटक केली असून पुढील तपास पोलीसांमार्फत करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत करण्यात आलेल्या विकासकामांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(४) * १७७६२ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत करण्यात आलेली बहुतांशी विकासकामे ही ठराविक ठेकेदारांनाच दिली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठेकेदार हे सदरील कामे अंदाजपत्रकीय दरापेक्षा सुमारे ३० ते ३५ टक्के कमी दराने निविदा भरुन प्रत्येक कामात निविदेत नमूद कामापेक्षा वाढीव काम केल्याचे दाखवून एकूण उपलब्ध निधीचा विनियोग करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंदाजपत्रकातील दरापेक्षा कमी दरात निविदा भरुन कामे करण्यात येत असल्यामुळे कामे निकृष्ट दर्जाची होत असून निविदेत नमूद कामापेक्षा वाढीव कामे करुन शासनाच्या निधीचा दुरुपयोग होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुषंगाने शासनाने अंदाजपत्रकापेक्षा कमी दरात करण्यात आलेल्या कामाची गुणवत्ता तपासून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित ठेकेदारावर तसेच निविदेत नमूद कामापेक्षा वेळोवेळी वाढीव कामे करण्यास मंजूरी देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये नंदुरबार जिल्ह्यातील एकूण ६७८ निविदांपैकी एकूण १६ निविदा या ३० ते ३५ टक्के कमी दराच्या प्राप्त झाल्या आहेत. कमी दराच्या बचतीतून कामाचा वाव वाढविण्यात आलेला नाही.
(३) हे खरे नाही.
सदर कामे ही करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे व विनिर्दिष्ट मानकाप्रमाणे करण्यात येत आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लेन्ड ए हॅन्ड (LEND-A-HAND) या कंपनीने समग्र शिक्षा अभियानांतर्गत व्यावसायिक प्रशिक्षणाकरिता नियुक्ती केलेल्या शिक्षकांच्या वेतनामध्ये गैरव्यवहार केल्याबाबत

**(५) * १७३०७ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत व्यावसायिक प्रशिक्षण देण्याकरिता व्यावसायिक शिक्षकांची नियुक्ती करुन सदर व्यावसायिक शिक्षकांचे वेतन अथवा या योजनेंतर्गत प्रोजेक्टच्या खर्च करण्याकरिता ही योजना त्रयस्थ संस्था लेन्ड ए हॅन्ड (LEND A HAND) यांच्यामार्फत राबविली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लेन्ड ए हॅन्ड (LEND-A-HAND) या कंपनीने यापूर्वी निकृष्ट साहित्य खरेदीत गैरव्यवहार केला असून सदर कंपनीची पात्रता नसताना त्यांना हे टेंडर दिले आहे तसेच या कंपनीने व्यवसाय शिक्षण योजनेचा डाटा अन्य कंपन्यांना विकला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे व्यावसायिक शिक्षकांना बारा महिन्यांचे वेतन मिळणे अपेक्षित असूनही प्रत्यक्षात उक्त कंपनी आपल्या राज्यातील व्यावसायिक शिक्षकांना केवळ १० महिन्यांचे वेतन अदा करते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (NSDC), नवी दिल्ली यांनी व्यवसायिक प्रशिक्षण देण्याकरिता पात्रता निर्धारित केलेल्या संस्थांमधुन सुयोग्य संस्थांची पारदर्शकपणे नियुक्ती करण्यात आली आहे. लेन्ड ए हॅन्ड (LEND A HAND) ही संस्था NGO असून कोणत्याही टेंडर प्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग नसून, त्यांच्यामार्फत कोणत्याही प्रकारचे साहित्य खरेदी करण्यात आलेले नाही.
(३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार व्यवसाय प्रशिक्षण संस्थेमार्फत, व्यवसाय प्रशिक्षकांना मानधन अदा करण्यात येते. दिनांक १ मे ते १५ जून या कालावधीमध्ये शाळांना उन्हाळी सुट्टी असल्याने मानधन अदा करण्यात येत नाही
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यातील शासकीय अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन व औषधनिर्माण संस्थांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(६) * १७११३ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यात शासकीय संस्थांच्या क्रमवारीत दर्जा व गुणवत्तेबाबत नावाजलेल्या शासकीय अभियांत्रिकी, तंत्रनिकेतनसह १३ संस्था असून या संस्थांकरिता वर्ग १ ते वर्ग ४ ची ७१३ पदे मंजूर असून त्यापैकी ४५८ पदे भरलेली आहेत तर २६३ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदांमुळे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, शैक्षणिक सत्र परीक्षा, मुल्यांकन, निकालाची कामे यासह इतर कामांवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर संस्थांमधील रिक्त पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

औरंगाबाद विभागात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय-१, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय-१ व शासकीय तंत्रनिकेतने-१० अशा शासनाच्या १२ अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत.

या संस्थांमध्ये वर्ग १ ते वर्ग ४ ची एकूण १६९३ पदे मंजूर असून त्यापैकी ११६२ पदे भरलेली आहेत. तर, ५३१ पदे रिक्त आहेत.

(२) नाही.

शैक्षणिक संस्थांतील सर्व कामे कार्यरत शिक्षकीय व शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून पूर्ण करुन घेतली जातात.

(३) राज्यातील अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्थांतील शिक्षकीय व शिक्षकेतर पदांची भरतीप्रक्रिया राबविण्याकरिता संवर्गनिहाय आरक्षणनिश्चिती व बिंदूनामावलीची तपासणी सहायक आयुक्त (मागास वर्ग कक्ष) व सामान्य प्रशासन विभाग (सा.वि.स.) यांचेकडून करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पालखी मार्गाच्या कामास विलंब होत असल्याबाबत

**(७) * १७१८७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्र. ९६५ दरम्यान होत असलेल्या कामामध्ये भुमी अधिग्रहण व ताबा देण्यास तसेच पुतळे /स्मारके/मंदिरे स्थलांतरीत करणे या कामामुळे ११ महिन्यांचा विलंब झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल, सार्वजनिक बांधकाम, कृषी, पाणीपुरवठा, विद्युत या विभागांसह जिल्हाधिकारी, सोलापूर तसेच सचिव, महसूल व वने यांच्याकडून केवळ बैठका घेऊन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत सर्व स्तरावरुन प्रयत्न केले जात असूनही अद्याप सदर पालखी मार्ग विहित मुदतीत पूर्ण होऊ शकलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पालखी मार्ग किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे, तसेच वरील अधिकाऱ्यांना राज्य शासन स्तरावरून कोणत्या सुचना करण्यात येणार आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी मार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित असून संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाचे (रा.म.क्र.९६५) कामासाठी विलंब झालेला आहे व संत तुकाराम महाराज पालखी मार्गाचे (रा.म.क्र.९६५जी) कामामध्ये विलंब झालेला नाही.

(२) होय.

(३) संत ज्ञानेश्वर पालखी मार्गाची ११० कि.मी. लांबी पूर्ण झालेली असून उर्वरित लांबी मार्च, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

संत तुकाराम महाराज पालखी मार्गाची एकूण लांबी १३० कि.मी. पैकी ७० कि.मी. लांबीचे काम पूर्ण झालेले असून उर्वरित लांबी सप्टेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## तुमसर (जि.भंडारा) तालुका मुख्यालयातील कामकाज प्रशासकीय इमारतीमधून सुरु करण्याबाबत

**(८) * १७८२२ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुमसर (जि.भंडारा) तालुका मुख्यालयातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालय एकाच इमारतीत असावेत याकरिता प्रशासकीय इमारतींना मंजुरी देण्यात येऊन सदर इमारतीचे बांधकाम दीड वर्षांपूर्वी पूर्ण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आल्यानंतरही सदरहू इमारत वापरात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रशासकीय इमारतींचा उपयोग प्रशासकीय कार्यालयासाठी सुरू न झाल्याने शासनाला उपविभागीय अधिकारी कार्यालय, तालुका कृषी कार्यालय, आणि इतर सर्व कार्यालयात भाडेतत्तवावर राहून कामकाज हाताळावे लागत असून भाड्यापोटी दरवर्षी लाखो रुपयांचा खर्च करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तुमसर (जि.भंडारा) तालुका मुख्यालयातील प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन करण्यात येऊन जनतेच्या सोयी सुविधांसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) तुमसर (जि.भंडारा) येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक १३/११/२०१७ च्या शासन निर्णयान्वये रुपये १३०३.७४ लक्ष इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सद्य:स्थितीत, सदर इमारतीचे स्थापत्य व विद्युतसह बांधकाम दिनांक १९/०९/२०२२ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.
(२) होय खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) व (५) सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूका डिसेंबर, २०२२ च्या कामकाजाकरिता सदर इमारत तहसिलदार, तुमसर यांना वापरास देण्यात आलेली होती. डिसेंबर, २०२२ सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूकीचे काम संपल्यानंतर, सदर इमारतीच्या हस्तांतरणाची ताबा पावती व सर्व दस्ताऐवज दिनांक ४/०१/२०२३ रोजी तहसिलदार, तुमसर यांना देण्यात आले होते. तथापि, विद्युत देयके व इतर किरकोळ दुरुस्तीची कारणे नमूद करुन, इमारतीची ताबा पावती सार्वजनिक बांधकाम विभागास केली आहे. त्यास अनुसरुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) * १७५०३ श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाअंतर्गत ९४१ मंजूर पदांपैकी ३७३ प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याचे दिनांक २५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठासाठी अध्यापकांची एकूण ३३९ पदे मंजूर असून त्यापैकी १७९ कार्यरत आहेत व १६० पदे रिक्त आहेत. शासन निर्णय दिनांक ०७/०८/२०१९ दिनांक १६/११/२०२२ अन्वये विद्यापीठासाठी मंजूर असलेल्या पदांपैकी ८० टक्के इतक्या मर्यादेत पद भरती करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. नागपूर विद्यापीठाने बिंदुनामावलीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता प्राप्त केली आहे. त्यानुसार पदभरतीची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह पथक, माध्यमिक, अहमदनगर यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१०) * १७४०१ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह पथक, माध्यमिक, अहमदनगर यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत अनेक शिक्षक संघटनांनी लेखी तक्रारी केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.शिक्षण संचालक आणि वेतन अधीक्षक, अहमदनगर यांनी पदाचा गैरवापर करुन १८ कोटी रुपयांची वैद्यकीय देयके मंजूर करुन गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या दोषी शिक्षण संचालक व वेतन अधिक्षकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्याचे कार्यासनातील अभिलेखावरुन दिसून येत नाही.

(२) आयुक्त (शिक्षण), पुणे यांचेकडून प्राप्त प्राथमिक चौकशी अहवालानुसार सकृतदर्शनी शासन नियमांचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.
(३) प्राथमिक चौकशी अहवालास अनुसरुन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), पुणे यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाय.ही.बियको गर्ल्स हायस्कुल व ज्यु.कॉलेज येथील उपशिक्षिकेस अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबत

**(११) * १७४५० श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाय.ही.बियको गर्ल्स हायस्कुल व ज्यु.कॉलेज येथील उपशिक्षिका यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २१ डिसेंबर, २०१९ नुसार परिच्छेद ४.२ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शासन निर्णयानुसार वाय.ही.बियको गर्ल्स हायस्कुल व ज्यु.कॉलेज येथील उपशिक्षिका यांना अद्यापही अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन देऊन सदर उपशिक्षिका यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाय.ही.बियको गर्ल्स हायस्कुल व ज्यु.कॉलेज येथील उपशिक्षिका यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) संबंधित उपशिक्षिका यांचा अधिसंख्य पदाबाबतचा प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयाकडून शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) व (५) विहित मार्गाने प्रस्ताव प्राप्त झाल्यास शासन निर्णय दिनांक २१/१२/२०१९ मधील तरतूदीनुसार तपासून कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## राज्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतनामध्ये अनियमितता होत असल्याबाबत

**(१२) * १७२२८ श्री.कपिल पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) अंतर्गत अधिकारी व कर्मचारी राज्य शासनाद्वारे नियुक्त केले गेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) मधील राजपत्रित अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन मागील तीन वर्षांपासून अनियमित होत असल्याने कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्यांनी संबंधित विभागाकडे वारंवार मागणी करूनही नियमित वेतनाचा प्रश्न मार्गी न लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) मधील पदे योजनेतंर्गत (plan) लेखाशिर्षातून योजनाबाहय (Non-plan) लेखाशिर्षामध्ये समाविष्ट करून २२०२११११५ या लेखाशिर्षातून सर्व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मधील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्य हिश्यामधून वेतनासाठी बीडीएस वर निधी वितरित करण्यात आला असून फेब्रुवारी, २०२३ पर्यंतचे वेतन अदा करता येईल.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासून केंद्रशासनाकडून वेतनासाठी निधी प्राप्त होणार नाही, सबब सदर पदे योजनांतर्गत लेखाशीर्षामधून योजनेतर लेखाशीर्षामध्ये समाविष्ट करण्याबाबत मंत्रिमंडळ प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हा परिषदेतील आंतरजिल्हा बदली अंतर्गत ९९ शिक्षक रुजु झाले नसल्याबाबत

**(१३)** * **१७५१५ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हा परिषदेत आंतरजिल्हा बदली अंतर्गत १२६ पैकी ९९ शिक्षक अजुनही रुजु झालेले नाहीत, मात्र सोलापूर जि.प. शाळांवरील ६६ शिक्षक त्यांच्या जिल्ह्यात गेले असल्याने सोलापूर जिल्ह्यातील तब्बल ११०० जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या तुलनेत शिक्षकांची संख्या कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये ४७० शिक्षकांची पदे रिक्त असून शिक्षक संख्या कमी असल्याने विद्यार्थी कमी झाले म्हणुन दक्षिण सोलापूर तालुक्यातील दोन शाळा बंद कराव्या लागल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आंतरजिल्हा बदलीतील ९९ शिक्षक रुजु करुन घेणेबाबत व सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील ४७० शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

आंतरजिल्हा बदली अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील ६६ शिक्षक इतर जिल्ह्यात जाणार असून, त्यापैकी ६१ शिक्षकांना कार्यमुक्त केले असून, ५ शिक्षकांनी कागदपत्रांची पूर्तता न केल्याने कार्यमुक्त करण्यात आले नाही.

तसेच इतर जिल्ह्यातुन सोलापूर जिल्ह्यात ११२ शिक्षक बदलीने येणार असून, त्यापैकी २९ शिक्षक हजर झाले असून, ८३ शिक्षक हजर झाले नाहीत.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०१७ ते सन २०२२ या कालावधीत आंतर जिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करण्याचे प्रशासकीय आदेश निर्गमित करुन, प्रत्यक्ष कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करण्याबाबत ग्रामविकास विभागाकडून सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी (TAIT)-२०२२ ची परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यात अंदाजे ३०,००० शिक्षकीय पदे भरण्याचा शासनाचा मानस आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत

**(१४) * १७६७४ श्री.जयंत आसगावकर, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना सातव्या वेतन आयोगामध्ये दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण क्षेत्रातील विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) सहाव्या वेतन आयोगानुसार रुपये ५४००/- ग्रेड पे पर्यंतच्या मॅट्रीक्समध्ये वेतन आहरीत करणाऱ्या राज्य शासकीय कर्मचारी/अधिकारी यांना त्यांच्या संपूर्णसेवा कालावधीमध्ये १०, २० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतर एकूण ३ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित

प्रगती योजना लागू करण्यात यावी, अशी शिफारस राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ ने केली होती. त्यानुसार स्वायत्त संस्था सोडून इतर कर्मचाऱ्यांकरिता केलेल्या शिफारशी स्वीकारण्यास वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०१/०१/२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. दिनांक ०२/०३/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू करण्यात आली आहे.

(२) व (३) अकृषी विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना उपरोक्त योजना अद्याप लागू करण्यात आलेली नाही, हे खरे आहे. सदर योजना उच्च व तंत्र शिक्षण, शालेय शिक्षण व अन्य विभागांशी संबंधित असल्याने याबाबत यथावकाश निर्णय घेण्यात येईल, असे निर्देश मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १५/०२/२०२३ च्या बैठकीत दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेंदुरजना घाट (जि.अमरावती) येथे शिधापत्रिकाधारकांकडून अतिरीक्त रक्कम वसूल करण्यात येत असल्याबाबत

**(१५) * १७६८२ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेंदुरजना घाट (जि.अमरावती) येथील स्वस्त धान्य वितरक शिधापत्रिकाधारक ग्राहकांकडून अतिरीक्त रक्कम वसूल करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूमिहीन नागरिकांना बी.पी.एल. यादीमध्ये समाविष्ट करुन घेण्यासाठी कुठलीही पावती न देता अतिरिक्त पैशांची मागणी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कुठलीही पावती न देता शिधापत्रिकाधारक ग्राहकांकडून अतिरिक्त पैशांची मागणी करणाऱ्या सदर स्वत धान्य वितरकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

ग्रोअर्स को-ऑपरेटीव्ह सोसायटी संचलित स्वस्त धान्य दुकान क्र.१८, गुजरी बाजार, मौजे शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती या रास्त भाव दुकानदाराविरुध्द संबंधित तक्रारदार यांचा दिनांक २५/११/२०२० रोजी तहसिल कार्यालय, वरुड येथे तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

(२) हे खरे आहे.

उपरोक्त रास्त भाव दुकानदाराने तक्रारदाराकडून अतिरिक्त पैसे घेतल्याचे व ते त्यांना परत केल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर रास्त भाव दुकानास जोडलेल्या अन्य ४० शिधापत्रिकाधारकांच्या बयाणानुसार रास्त भाव दुकानदाराने शिधापत्रिकाधारकांकडून अतिरीक्त पैसे घेतल्याचे आढळून आले नाही.

(३) दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रात दिनांक २९/११/२०२२ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने निरिक्षण अधिकारी, वरुड यांनी दिनांक ३०/११/२०२२ रोजी मौजे शेंदुरजनाघाट, ता.वरुड,जि.अमरावती येथील सर्व आठ रास्त भाव दुकानांची चौकशी केली व १५० शिधापत्रिकाधारकांचे बयाण घेण्यात आले.

रास्त भाव दुकानदार, स्वस्त धान्य दुकान क्र.१८ यांनी तक्रारदाराकडून घेतलेले पैसे परत केल्यानंतर तक्रारदार यांनी तक्रार मागे घेत असल्याचे बयाणात नमूद केले असल्याने सदर रास्त भाव दुकानदार यांनी अतिरिक्त पैसे घेतल्याचे निष्पन्न झाल्याने जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती यांनी संबंधित रास्त भाव दुकानदार यांना दिनांक ०१/०३/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रानसई (ता.उरण, जि.रायगड) धरणातील पाण्याची साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी धरणाची उंची वाढवून गाळ काढण्याबाबत

**(१६) * १६९७८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रानसई (ता.उदण, जि.रायगड) येथील धरणातील पाण्याची साठवणूक क्षमता कमी झाल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने उरणमध्ये आठवड्यातून तीन दिवस पाणी कपात करण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरणमधील नागरी वसाहतींसह औद्योगिक विभागाला सदर निर्णयामुळे पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार असून ६० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या रानसई धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पाणी साठवणूक क्षमता फक्त ७ दशलक्ष घनमीटरवर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रानसई धरणातील पाणीसाठा वाढविण्यासाठी धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव गेल्या १० वर्षांपासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उरणमधील नागरी वसाहतींसह औद्योगिक विभागाला मुबलक पाणीपुरवठा होण्यासाठी तसेच धरणातील गाळ काढण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

उरण (जि.रायगड) तालुक्यातील मऔवि महामंडळाच्या रानसई धरणाची पाणी साठवण क्षमता १०.०८० दलघमी इतकी आहे. त्यापैकी उपयुक्त पाणी साठा ८.४९० दलघमी एवढा असून, पावसाळ्या व्यतिरिक्तच्या कालावधीसाठी बाष्पीभवन व इतर वहनव्यय वगळता सुमारे ७ दलघमी पाणी पुरवठ्यासाठी दरवर्षी उपलब्ध होतो.

दरवर्षी दिघोडे येथील बार्टर व्यवस्थेमधून उरणसाठी १० द.ल.लि. प्रति दिन पाणीपुरवठा अपेक्षित असतो. परंतु, तो कमी होवून ३.२ द.ल.लि. प्रति दिन इतका झाला आहे. या कारणास्तव पूर्वी आठवड्यातून दोन दिवस पाणी कपात असायची. मात्र यावर्षी दिघोडे येथील बार्टर व्यवस्थेमधून पाणीपुरवठा झालेला नसल्याने सर्व ग्रामपंचायती व नगरपरिषद यांचा आठवड्यातून तीन दिवस व इतर सर्व ग्राहकांचा आठवड्यातून दोन दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय मऔवि महामंडळाने घेतला आहे.

(२) हे खरे नाही.

रानसई धरणात गाळ साचला आहे किंवा कसे याबाबत शहानिशा करण्याकरिता सर्वेक्षणाचे काम भारत सरकारच्या अखत्यारितील मे. सेंट्रल वॉटर ॲण्ड पॉवर रिसर्च स्टेशन, पुणे या संस्थेस दिनांक १०/१०/२०१४ रोजी देण्यात आले होते. सदर संस्थेकडून दिनांक २२/०१/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या अहवालानुसार ०.०२ दशलक्ष घन मीटर म्हणजे धरण साठ्याच्या ०.४४ टक्के इतका गाळ आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

मऔवि महामंडळाच्या दिनांक २६/०२/२००५ रोजीच्या २९८ सभेत ठरावाव्दारे रानसई धरणाची उंची वाढविण्याच्या कामाकरिता रुपये ३३७५/- लक्ष (निव्वळ) व रुपये ३८८५/- लक्ष (ठोक) खर्चास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

रानसई धरणाची उंची वाढविण्यासाठी भूसंपादनासाठीचा प्रस्ताव मऔवि महामंडळामार्फत उप वनसंरक्षक, अलिबाग वनविभाग, अलिबाग यांच्या कार्यालयास दिनांक २०/०८/२००८ रोजी सादर केला आहे. त्याअनुषंगाने वन विभागाने दिनांक ११/११/२००८ रोजीच्या पत्राव्दारे सदर प्रस्तावाबाबत काही त्रुटीची पुर्तता करण्याबाबत कळविले आहे. सदर त्रुटीमध्ये त्यापैकी संबंधित ग्रामसभेचा ना-हरकत प्रमाणपत्र व त्यावर जिल्हाधिकारी यांचे अभिप्राय आवश्यक असल्याचे वन विभागाने पत्रात नमूद केले आहे.

त्याअनुषंगाने संबंधित गावांच्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेच्या ठरावानुसार मऔवि महामंडळाकडे विविध मागण्या केल्या असून, त्याची पूर्तता झाल्याशिवाय ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास विरोध असल्याचे सरपंच, ग्रामपंचायत रानसई यांनी कळविले आहे. त्यामुळे वनजमीन संपादनाचा प्रस्ताव प्रलंबित आहे. याबाबत संबंधित ग्रामस्तांसोबत मऔवि महामंडळामार्फत पाठपुरावा सुरु असून, वन जमीन भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर रानसई धरणाची उंची वाढविण्याचे काम प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा व वाडा (जि.पालघर) तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांचे वेतन थकीत असल्याबाबत

**(१७) * १६९९५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा व वाडा (जि.पालघर) या दोन तालुक्यांतील प्राथमिक शिक्षकांना माहे नोव्हेंबर आणि डिसेंबर, २०२२ या दोन महिन्यांचा पगार अद्यापही देण्यात आला नसल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन महिने पगार न मिळाल्याने मोखाडा आणि वाडा तालुक्यातील प्राथमिक शिक्षक आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तद्‌नूसार मोखाडा व वाडा तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांना थकीत वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) मोखाडा व वाडा तालुक्यातील शिक्षकांचे माहे नोव्हेंबर, २०२२ चे वेतन दिनांक २६/१२/२०२२ व माहे डिसेंबर, २०२२ चे वेतन दिनांक १९/१/२०२२ अन्वये अदा करण्यात आलेले आहे.

(३) वित्त विभागाने दरमहा वितरित केलेले अनुदान विभागाने आयुक्त (शिक्षण) कार्यालयाला वितरित केले आहे. "वितरीत केलेले अनुदान केवळ नियमित वेतनासाठी असून यामधून अन्य कोणतेही देयके या अनुदानातून अदा करण्यात येऊ नये" असे स्पष्ट निर्देश संचालनालयाने दिले असतानाही काही जिल्ह्यामध्ये कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन, ७ व्या वेतन आयोगाचा १ ला, २ रा व ३ रा हप्ता, थकीत महागाई भत्ता व इतर थकीत देयके अदा करण्यात आली, त्यामुळे काही जिल्ह्यातील शिक्षकांचे नियमित वेतन होऊ शकले नाहीत. ज्या जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद शिक्षकांचे वेतन झालेले नाही, त्या जिल्ह्यांमधील जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर संचालनालय स्तरावर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देहूरोड-कात्रज (जि.पुणे) बाह्यवळण मार्गावरील भुयारी मार्गाचे (सबवे) काम करण्याबाबत

**(१८) * १७८७१ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देहूरोड-कात्रज (जि.पुणे) बाह्यवळण मार्गावरील विकासनगर–किवळे ते उत्तमनगर, लेखा फार्म देवी वन या भागाला जोडण्यासाठी भुयारी मार्ग (सबवे) होण्याकरिता फुले शाहू आंबेडकर विचार मंच व स्थानिक नागरिकांनी महामार्गावर माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यासुमारास रास्ता रोको आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंदोलनाच्या अनुषंगाने शासन स्तरावर काय निर्णय घेण्यात आला आहे वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भुयारी मार्गाचे काम कधीपर्यंत हाती घेण्यात येणार आहे व त्याकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय.

(२) व (३) देहूरोड-कात्रज या राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे. डीपीआर सल्लागारास भुयारी मार्गासाठी तपशीलवार अहवाल देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच सदर ठिकाणी उन्नत पादचारी मार्ग बनविण्याच्या कामाचे अंदाजपत्रक मंजूरीस्तरावर असून मंजूरी मिळाल्यानंतर उन्नत पादचारी मार्गाचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील राष्ट्रीय आणि आंतरराज्य कंपन्या आणि कार्यालयात मराठी भाषेचा वापर करण्याबाबत

**(१९) * १७९०० श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राष्ट्रीय आणि आंतरराज्य बँकासह टपाल कार्यालये, विमान कंपन्या, गॅस व पेट्रोलियम कंपन्या, कर विभाग, दूरध्वनी कंपन्या, रेल्वे, मेट्रो रेल्वे इत्यादी कार्यालयात इंग्रजी आणि हिंदी भाषेसह मराठी भाषेचा वापर करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी जाहीर केलेल्या परिपत्रकाची अंमलबजावणी सदरहू कार्यालयांनी केली नसल्याची बाब दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकांचे सर्व दस्तऐवज, रेल्वे, विमान आरक्षणाचे अर्ज, मोनो-मेट्रोची तिकिटे यामध्ये अजूनही देवनागरीचा वापर करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील राष्ट्रीय आणि आंतरराज्य बँकासह टपाल कार्यालये, विमान कंपन्या, गॅस व पेट्रोलियम कंपन्या, कर विभाग, दूरध्वनी कंपन्या, रेल्वे, मेट्रो रेल्वे इत्यादी कार्यालयांत इंग्रजी आणि हिंदी भाषेसह मराठी भाषेचा वापर करण्याबाबतच्या शासन परिपत्रकाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी जाहीर केलेल्या परिपत्रकाची अंमलबजावणी सदरहू कार्यालयांनी केली नसल्याबाबतचे पत्र दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास प्राप्त झालेले आढळून आले नाही. तथापि, त्रिभाषा सुत्रानुसार मराठी भाषेचा वापर रेल्वे, राज्य कामगार विमा योजनेचे कार्यालय, बँका, केंद्रीय कार्यालये यामध्ये करण्यात येत नसल्याबाबतच्या काही तक्रारी "आपले सरकार" तक्रार प्रणालीवर प्राप्त झालेल्या आहेत.

(२) व (३) राज्यातील राष्ट्रीय आणि आंतरराज्य बँका, रेल्वे, विमान, मोनो-मेट्रो, टपाल कार्यालये, विमान कंपन्या, गॅस व पेट्रोलियम कंपन्या, कर विभाग, दूरध्वनी कंपन्या हे सर्व उपक्रम केंद्र शासनाच्या अखत्यारितील असल्याने केंद्र शासनाने त्रिभाषा सुत्राच्या अनुषंगाने दिलेल्या सूचनांनुसार संबंधित कार्यालये कार्यवाही करतात.

तरीसुध्दा कार्यासनांत वेळोवेळी प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद कार्यालयांत, त्रिभाषा सुत्रानुसार इंग्रजी व हिंदी भाषेबरोबर मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात विनंती संबंधित कार्यालयांना पत्र पाठवून करण्यात येते. यापुर्वी मा.मंत्री (मराठी भाषा) यांच्यास्तरावर मा.रेल्वेमंत्री आणि मा.गृहमंत्री यांच्याशी त्रिभाषा सुत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्याला सकारात्मक उत्तर देखील प्राप्त झाले आहे.

याशिवाय उपरोक्त नमूद कार्यालयांमध्ये प्रादेशिक भाषा म्हणून मराठी भाषेचा वापर करण्यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचना दिनांक १०/०६/२०१९ च्या पत्रान्वये मा.मुख्य सचिव स्तरावर सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच दिनांक ०६/११/२०२० च्या शासन परिपत्रकान्वये स्थानिक भाषा म्हणून मराठी भाषेचा वापर करण्यात येतो किंवा कसे याबाबतचे स्वयंघोषणापत्र सदर कार्यालयांकडून प्राप्त करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना व भाषा संचालक यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग-कोल्हापूर रस्त्याच्या क्राँक्रिटीकरण व दुपदरीकरणाच्या कामाबाबत

**(२०) * १८२३५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग-कोल्हापूर या जिल्ह्यांना जोडणाऱ्या २१ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या क्राँक्रिटीकरण व दुपदरीकरणाच्या कामाला शासनाने माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर रुपये २४९ कोटींची मान्यता दिल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ हा सिंधुदुर्ग व कोल्हापूर या जिल्ह्यांना जोडणारा महामार्ग असून सदर मार्ग साखर कारखानदारी व पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने येथे पडणाऱ्या पावसामुळे सदर रस्त्याची दुरवस्था होत असून वाहतूकीस अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे क्राँक्रिटीकरण व दुपदरीकरण केल्याने हजारो प्रवाशांना त्याचा लाभ मिळणार असून सदर रस्त्याच्या क्राँक्रिटीकरणासह दुपदरीकरणाच्या कामाची सद्यस्थि:ती काय आहे,

(४) असल्यास, सिंधुदुर्ग-कोल्हापूर या २१ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या क्राँक्रिटीकरण व दुपदरीकरणाचे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदर कामास रुपये २४९.१३ कोटी रकमेस केंद्र शासनाच्या वार्षिक आराखडा २०२२-२३ अंतर्गत दिनांक १४/०२/२०२३ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) होय.

महामार्गावरील खड्डे पावसाळयात नियमितपणे भरुन वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.

(३) सदर कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

(४) सदर प्रस्तावित काम माहे मार्च, २०२५ अखेर पूर्ण करण्यचे नियोजन आहे.

-----------------

## राज्यातील अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याबाबत

**(२१) * १८२७८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५६० प्राथमिक तर ११४ माध्यमिक शाळा अनधिकृत असल्याबाबत दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृतपणे सुरू असलेल्या सर्वाधिक शाळा मुंबईत आहेत तसेच विविध विभागांत अनधिकृत शाळा सुरू राहिल्याच्या तक्रारी शिक्षण संचालनालयाकडे येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुषंगांने अनधिकृत शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश न घेणेबाबत वर्तमानपत्राच्या माध्यमातून पालकांना आवाहन करण्यात आले आहे. तसेच, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या कलम १८ (५) मधील तरतुदीनुसार सदर अनधिकृत शाळांना द्रव्यंदडाची शिक्षा करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील वसतिगृहास पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२२) * १८३४५ श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पस येथील विद्यार्थिनींसाठी उभारलेल्या न्यू गर्ल्स हॉस्टेल या वसतिगृहाचे मा.राज्यपाल यांच्या हस्ते दिनांक ८ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास उद्घाटन करण्यात आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतिगृहाची १४८ विद्यार्थिंनीची प्रवेश क्षमता असतानाही क्षमतेपेक्षा कमी ७५ विद्यार्थींनी सदर वसतिगृहत वास्तव्य करत असूनही वसतिगृहासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने नवीन नळजोडणी न केल्याने दर दिवशी २० हजार लिटर क्षमतेच्या टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वसतिगृहासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नवीन नळजोडणी करण्याचे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर वसतिगृहास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नवीन नळजोडणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नळजोडणी होईपर्यंत सदर इमारतीस २० हजार लिटर क्षमतेच्या टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मुंबई विद्यापीठातर्फे नवीन मुलींच्या वसतिगृहासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे नवीन नळजोडणीची प्रकिया प्रगतीपथावर आहे. त्याअंतर्गत बृहन्मुंबई

महानगरपालिकेच्या विविध विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात येत आहेत. तसेच विविध बाबींसाठी आवश्यक शुल्क, अनामत रक्कम मीटर जोडणी शुल्क, मालमत्ता कर, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे जमा करण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून प्रगती पथावर आहे. लवकरच सदर नवीन मुलींच्या वसतिगृहास बृहन्मुंबई महानगरपालिकेची नवीन पाणीपुरवठा जोडणी करण्यात येत आहे. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनींची कोणतीही गैरसोय होणार नाही यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मराठी भाषा भवनाच्या मुख्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(२३) * १८३८७ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चर्नीरोड परिसरात मराठी भाषा भवनाच्या मुख्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने मराठी भाषा भवनाच्या इमारतीच्या बांधकामास किती खर्च येणार आहे, तसेच सदर बांधकामाचे स्वरूप काय आहे व सदर बांधकाम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय.

(२) मराठी भाषा भवन मुख्य केंद्र या इमारतीच्या बांधकामाकरिता मे.पी.के.दास ॲण्ड असोसिएटस, मुंबई यांची वास्तूविशारद म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर वास्तूविशारद यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास सादर केलेल्या एकूण रुपये १३२.६७ कोटी इतक्या ढोबळ अंदाजपत्रकाची शासनस्तरावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून छाननी करण्यात आली असून सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणना करून रुपये १२६.८९ कोटी इतक्या ढोबळ अंदाजपत्रकास सहमती दर्शविली आहे. तसेच रुपये १२६.८९ कोटी इतक्या किंमतीच्या ढोबळ अंदाजपत्रकास मा.उच्चस्तरीय सचिव समितीने सहमती दर्शविली आहे. त्यास अनुसरून शासनाच्या दिनांक ०६/०४/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयांना मराठी भाषा भवन उपकेंद्र, ऐरोली, नवी मुंबई या प्रस्तावित इमारतीमध्ये जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, मा.मंत्री, मराठी भाषा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३०/११/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये सदर क्षेत्रिय कार्यालयांना मराठी भाषा भवन मुख्य केंद्र, चर्नी मार्ग, मुंबई येथील इमारतीमध्ये जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मराठी भाषा भवन मुख्य केंद्र व शालेय शिक्षण विभागाच्या अधिनस्त जवाहर बालभवन यांची संयुक्त इमारत उभारण्याचा निर्णय मा.मंत्री, मराठी भाषा यांनी दिनांक २४/०१/२०२३ रोजीच्या बैठकीत घेतला आहे. त्यानुसार सदर इमारतीचे सुधारित आराखडे सादर करण्याबाबत मा.मंत्री, मराठी भाषा यांनी उपरोक्त बैठकीत वास्तूविशारद व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषदेच्या २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत

**(२४) * १८३९८ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २० पेक्षा कमी पटसंख्येच्या ४,८०० शाळा बंद करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा बंद केल्यास हजारो विद्यार्थी विशेषत: मुली शाळाबाहय होणार असून या शाळा सुरु ठेवण्यासाठी ७५०० निवृत्त शिक्षकांची नेमणूक करण्याचा शासनाचा विचार असून याबाबतचा प्रस्ताव शिक्षण आयुक्त कार्यालयात तयार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवृत्त शिक्षकांच्या नियुक्तीला संस्थाचालक, शिक्षकांच्या संघटना आणि नोकरीच्या संधीची वाट पाहणाऱ्या डीएड-बीएड उमेदवारांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, २० पटसंख्या असलेल्या शाळा ह्या ग्रामीण भागात व आदिवासी पाड्यातील असून या शाळांमध्ये पूर्णवेळ शिक्षक नेमण्यापेक्षा निवृत्त शिक्षकांची नेमणूक केल्यास त्यांच्यावर कामाचा ताण कमी पडेल व निवृत्त शिक्षकांमार्फत या शाळा चालविण्याची सरकारची योजना आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांवर निवृत्त शिक्षकांची नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कमी पटसंख्या असलेल्या शाळांतील शैक्षणिक दर्जा सुधारुन शाळा बंद न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) दहा पटसंख्येपेक्षा कमी असलेल्या जिल्हा परिषदेच्या ज्या शाळांमध्ये सद्य:स्थितीत दोन नियमित शिक्षक कार्यरत आहेत, त्यापैकी एका नियमित शिक्षकाची बदली जास्त पटसंख्या असलेल्या शाळेमध्ये करून त्याजागी सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकाची कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यासंदर्भातील प्रस्ताव आयुक्त (शिक्षण) यांनी शासनास सादर केला आहे.

(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील क्लस्टर उद्योग सुरू करण्याबाबत

**(२५) * १८५३० प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील छोट्या उद्योगांचा समूह विकास होण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र शासनाच्या क्लस्टर (MSE-CDP) या योजनेच्या धर्तीवर ''महाराष्ट्र राज्य आद्यौगिक समूह विकास'' योजना दिनांक २५ फेब्रुवारी २०१४ रोजी वा त्यासुमारास राज्यात सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विविध ग्रामीण अविकसित भागातील छोट्या उद्योगांसाठी अतिशय महत्त्वकांक्षी असलेल्या या योजनेंतर्गत जवळपास ३० ते ७० पेक्षा जास्त क्लस्टर सुरू होण्याच्या प्रतीक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील छोट्या उद्योगांचा क्लस्टरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकास व रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोरोना महामारीमुळे माहे मार्च, २०२२ पासून राज्यातील अनेक क्लस्टर उद्योग अडचणीत आले असून सदर क्लस्टर तातडीने सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील सुक्ष्म व लघु उपक्रमांच्या सर्वांगिण विकासासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (MSI-CDP) दिनांक २५ फेब्रुवारी २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंमलात आली आहे. सदर योजना राज्यातील क, ड, ड+ क्षेत्र, विना उद्योग जिल्हे, नक्षलग्रस्त क्षेत्रात राबविण्यात येते.
(२) MSI-CDP योजनेंतर्गत राज्यातील एकूण २०९ औद्योगिक समूह प्रकल्पांना क्षमतावृद्धी कार्यक्रमांतर्गत मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी एकूण ९८ औद्योगिक समूह प्रकल्पांना सामायिक सुविधा केंद्र उभारणींतर्गत अंतिम मंजूरी देण्यात आलेली आहे. अंतिम मंजूरी प्राप्त एकूण ९८ प्रकल्पांपैकी ४८ औद्योगिक समूह प्रकल्पांचे सामायिक सुविधा केंद्रे कार्यान्वित झालेली आहेत.
(३) होय, हे खरे आहे.

राज्य शासनाच्या अनुदान स्वरुपातील आर्थिक सहाय्यातून एकाच उद्योग संवर्गात कार्यरत सुक्ष्म व लघु उपक्रमांचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी सदर योजनेतून कार्यक्रम अंमलबजावणी करण्यात येत आहे. सामायिक सुविधा केंद्राव्दारे (CFC) उच्च दर्जाचे तंत्रज्ञान सहजपणे स्थानिक उद्योग घटकांना उपलब्ध होत असल्याने त्यांची उत्पादने अधिक मुल्यवर्धीत होत आहेत. क्लस्टर योजनेच्या अंमलबजाणीमुळे स्थानिक ठिकाणी नवे उद्योग घटक व विस्तारीकरण होत असल्याने नवीन व गुणवत्तापूर्ण रोजगार उपलब्ध होत असून उद्योग घटकांची कार्यक्षमता वाढून विकास होत आहे.
(४) कोविड-१९ मध्ये प्रकल्प अंमलबजावणी करताना येत असलेल्या अडचणींचे निराकरण होणेसाठी कार्यान्वित समूह प्रकल्पांना पुढील टप्प्यातील कामकाजासाठी विनातारण कर्ज उपलब्ध होणेसाठी उद्योग संचालनालयामार्फत विविध बँका, सिडबी तसेच सुक्ष्म व लघु उद्योगांकरिता क्रेडीट गॅरंटी ट्रस्ट फंड (CGTMSE) यांचेसमवेत आवश्यक समन्वय व चर्चा करण्यात येत आहेत. शासनाच्या इतर विविध योजना उदा. CMEGP, PMEGP, उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम व औद्योगिक पायाभूत सुविधा विकास योजनांचा लाभ मंजूरीप्राप्त प्रकल्पांना देण्यात येत आहे. तसेच औद्योगिक समूहांकरिता राज्याच्या औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती व विकास योजनेतून एक्सप्रेस फिडर, रस्ते, अखंडीत वीज, संरक्षक भिंत उभारणी इत्यादी करिता औद्योगिक समूहांना Last mile connectivity करिता ७५% व Express Feeder अंतर्गत १००% अर्थसहाय अनुदान स्वरूपात मंजूर करण्यात येते. MSICDP योजनेंतर्गत कार्यान्वित झालेल्या ०५ प्रकल्पांतर्गत औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती व विकास योजनेतून अतिरिक्त रुपये ७५.९१ कोटी अर्थसहाय अनुदान स्वरूपात मंजूर करण्यात आले आहे. सदर समूह

प्रकल्पांची सामायिक सुविधा केंद्रे या पायाभूत सुविधांमुळे अधिक सक्षमतेने कार्यरत राहण्यास मदत होणार आहे. औद्योगिक समूहांच्या अडचणी निवारणाकरिता जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय औद्योगिक समूह समन्वय समिती तसेच राज्यस्तरावर मैत्री या एकल खिडकी उपक्रमाची सुविधा पुरविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत

**(२६) * १८६१३ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीच्या पुनर्विकासाचा प्रकल्प अद्यापही अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय वसाहतीतील रहिवाशांना मालकी हक्काच्या सदनिका देण्यासाठी भूखंड उपलब्ध करण्याच्या प्रस्तावास महाविकास आघाडी सरकारने सन २०२२ मध्ये तत्वतः मान्यता दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुषंगाने शासकीय वसाहतीतील रहिवाशांना मालकी हक्काच्या सदनिका देण्यासाठी भूखंड उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावाच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकास प्रजासत्ताक कोरीया यांच्या मदतीने करण्याचे नियोजित असून, दक्षिण कोरीया सरकारच्या कोरीया लँड ॲण्ड हाऊसिंग कॉर्पोरेशन यांचे समवेत करारनामा करण्यात आला आहे. कोरीया लँड ॲण्ड हाऊसिंग कॉर्पोरेशनमार्फत प्रकल्पाचा सुधारित आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. याव्यतिरिक्त वांद्रे (पूर्व) येथील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांकरिता १२ बहुमजली इमारतींची बांधकामे सद्य:स्थितीत प्रगतीत असून, एकूण २०१२ सदनिका टप्प्याटप्प्याने उपलब्ध होणार आहेत.
(२) दिनांक २९/०६/२०२२ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये शासकीय वसाहत वांद्रे (पूर्व) येथे वर्षानुवर्षे राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या स्वत:चे मालकीचे घर मिळण्याबाबत या विषयावर मंत्रिमंडळाने चर्चा केली आणि उपरोक्त विषय तपासून मंत्रिमंडळापुढे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.
(३) व (४) दिनांक २/०३/२०२३ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांनी सर्व संबंधित स्थानिक लोकप्रतिनिधी, संबंधित अधिकारी वर्ग व रहिवाशी संघटनेचे पदाधिकारी यांचेसोबत बैठक घेतली आहे. शासकीय वसाहतीतील रहिवाशांना मालकी हक्काच्या सदनिका देण्यासाठी भूखंड उपलब्ध करुन देण्याची बाब धोरणात्मक असून, त्यादृष्टीने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## राज्यातील शालेय शिक्षण विभागातील आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(२७) * १८६३७ श्री.सत्यजीत तांबे : दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ७१३९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागातील आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचारी-अधिकारी यांना एकस्तर वेतनश्रेणी सुरु असताना, वरिष्ठ वेतनश्रेणी व कालबध्द पदोन्नती (चटोपाध्याय) मंजूर झाल्यास त्या क्षेत्रात कार्यरत असेपर्यंत एकस्तर वेतनश्रेणीनुसार लाभ मिळावा अशी मागणी या कर्मचाऱ्यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यमान मूळ वेतनाच्या १५ टक्के किंवा जास्तीत जास्त रुपये १५००/- प्रोत्साहन भत्ता लागू करुन मागील थकबाकीची रक्कम मिळावी व ७ वा वेतन आयोग सुधारित नियम, २०१९ नुसार वेतन निश्चित करताना एकस्तर वेतनश्रेणी मंजूर असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांची एकस्तर वेतनश्रेणीनुसारच वेतननिश्चिती करण्यात यावी तसेच निवृत्तीवेतनधारक कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनाची वेतननिश्चीती करतानादेखील एकस्तर वेतनश्रेणीच्या लाभासह वेतननिश्चीती करण्यात यावी अशी या विभागातील कर्मचाऱ्यांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणीनुसार पदोन्नती देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १४ ऑगस्ट, २००८ रोजी निर्गमित केला असून याबाबत सामान्य प्रशासन विभागाने गठित केलेल्या समितीचा अहवालदेखील शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांवर तसेच अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. माहे जानेवारी, २०२३ मध्ये मागणी केल्याचे आढळून आलेले नाही.

(३) हे खरे आहे. सामान्य प्रशासन विभागामार्फत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीच्या अहवालात करण्यात आलेल्या शिफारशींचा साधक बाधक विचार करुन राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागात सेवारत असणाऱ्या राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय करावयाच्या सुधारित सवलतींबाबत सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्यात येतील. त्यानंतर नक्षलग्रस्त /आदिवासी भागात काम करणाऱ्या मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक/ माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग कनिष्ठ महाविद्यालय व सैनिकी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सदर लाभ देण्याबाबतची कार्यवाही नियोजित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना सातव्या वेतन आयोगाचा तिसरा हप्ता मिळण्याबाबत

**(२८) * १७१३१ श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील डीसीपीएस व एन पी एस अंतर्गत येणाऱ्या प्राध्यापकांना सातव्या वेतन आयोगाचा तिसरा हप्ता मिळणेबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने वरिष्ठ महाविद्यालयातील डीसीपीएस व एन पी एस मध्ये येणाऱ्या प्राध्यापकांना सातव्या वेतन आयोगाचा तिसरा हप्ता मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) सातवा वेतन आयोगाच्या राज्य शासन हिश्श्याचा तिसरा हप्ता राज्यातील अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठ, शासकीय, अशासकीय अनुदानित महाविद्यालये, शिक्षणशास्त्र महाविद्यालये व शारिरीक शिक्षण व विधी महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना विद्यापीठनिहाय लेखाशिर्षाखाली दिनांक ०३/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार संचालक, उच्च शिक्षण पुणे यांनी निधी उपलब्ध करुन दिला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अक्कलकुवा (जि.नंदुरबार) येथे विविध अवैध धंदे करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(२९) * १७४६३ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अक्कलकुवा (जि.नंदुरबार) येथील श्री.महेश परमसुख तंवर व त्यांच्या परिवारातील श्री.सुरेश परमसुख तंवर, श्री.रमेश परमसुख तंवर हे गेल्या अनेक वर्षांपासून अक्कलकुवा शहरात खाण्याच्या तेलात भेसळ करीत असून विविध प्रकारच्या कंपनीचे बनावट लेबल तयार करुन त्यांची पॅकेजिंग करुन बाजारपेठेत भेसळयुक्त तेलाची विक्री करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भेसळयुक्त तेलामुळे नागरिकांना विविध प्रकारच्या आजारांना सामोरे जावे लागत असतानाही शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर व्यावसायिकांचे महू फुलांपासून दारु बनविणे तसेच दारु व अफीमसारख्या मादक पदार्थांची विक्री करणे असे अवैध धंदे अक्कलकुवा शहर, बाहेरच्या राज्यांमध्ये सुरु असून याकडे स्थानिक पोलीस निरीक्षक व तालुका प्रशासन दुर्लक्ष करीत असून उक्त अवैध धंद्याबाबत त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींवर गुजरात राज्यात गुन्हा दाखल झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित तंवर परिवाराचे अक्कलकुवा (जि.नंदुरबार) येथे अवैध धंदे सुरु असूनही त्यांच्यावर कारवाई न करता त्यांना पाठीशी घालणाऱ्या स्थानिक पोलीस निरीक्षक व तालुका प्रशासनातील अधिकाऱ्यांची चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येतआहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, तहसिलदार, अक्कलकुवा, जि.नंदुरबार यांच्याकडून दुरध्वनीवरील प्राप्त तक्रारीनुसार, दिनांक १३/१२/२०२२ रोजी अन्न सुरक्षा अधिकारी, नंदुरबार यांनी श्री.सुरेश परमसुख तंवर (पेढीमालक) मे. गोपा प्रोव्हिजन, प्लॉट नं. १८, मोठाफली, अक्कलकुवा, ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार या पेढीची तपासणी करून पेढीत विक्रीसाठी उपलब्ध असलेले रिफाईंड सोयाबिन तेल व आर.बी.डी पामोलीन तेल या खाद्यतेलाचे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेवून एकूण किंमत रुपये २२,३७,३००/- चा खाद्यतेलाचा साठा भेसळयुक्त असल्याच्या संशयावरुन व खुले खाद्यतेल विक्री केल्यामुळे जप्त करण्यात आलेला आहे.
(३) रमेश परमसुख तंवर यांचे नावाने महु फुल विक्रीचा परवाना असून त्याचा क्रमांक मोहाफुल क्र.४२ असा आहे.

नंदुरबार जिल्हा घटकातील अक्कलकुवा पोलीस ठाणेला अफीम सारख्या मादक पदार्थांच्या विक्री संदर्भात गुन्हा दाखल नसून गुजरात राज्यात अफीम बाबत रमेश तंवर यांचेविरुध्द सागबारा पोलीस ठाणेला (गुजरात राज्य) येथे ०१ गुन्हा दाखल आहे.

फिर्यादी दिनेश ज्ञानेश्वर तांबोळी, अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन नंदुरबार यांनी महेश परमसुख तंवर यांचे भाऊ सुरेश परमसुख तंवर यांचे विरुध्द अक्कलकुवा पोलीस स्टेशनला फौ.गुरनं १९३/२०२१, भादंवि कलम १८८, २७२, २७३, ३२८ सह अन्न सुरक्षा मानके अधि. २००६ चे कलम २६ (२)(i), ३(१)(zz), २७(३)(ई), २६(२)(iv), ३०(२)(a), २७ (३)(d), ५९ प्रमाणे दिनांक ०९/०३/२०२१ रोजी गुन्हा नोंद असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे. सन २०२१ ते २०२३ पावेतो वर नमुद गुन्हा दाखल असून त्यात त्यांच्या दिनांक ०९/०४/२०२१ रोजी सी.आर.पी.सी. १०७ प्रमाणे चॅप्टर केस क्र. ५४/२०२१ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील तासिका तत्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांना सेवार्थ प्रणालीद्वारे बँक खात्यामध्ये वेतन देण्याबाबत

**(३०) * १७२९० श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांर्तगत शासकीय महाविद्यालय अथवा विद्यापीठांतर्गत वेगवेगळ्या विभागामध्ये तासिका तत्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांना त्यांच्या बँक खात्यामध्ये सेवार्थ प्रणालीद्वारे महिन्याचे वेतन देण्याचा शासनाचा दिनांक १४ नोव्हेंबर २०१८ रोजीचा शासन निर्णय अस्तित्वात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कोणत्याही विभागामध्ये या नियमाची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी तासिका तत्वाच्या प्राध्यापकांना ५०० रुपये प्रती तास ऐवजी ६२५ रुपये असे मानधन वाढवून दिले होते, परंतु त्याचीही अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने तासिका तत्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांबाबत उक्त शासन निर्णयातील नियमांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ या शासन निर्णयातील अट क्र.८ नुसार तासिका तत्वावरील नियुक्त अध्यापकांना त्यांचे मानधन दरमहा नियमित स्वरुपात सेवार्थ/एचटीई सेवार्थ प्रणालीमार्फत अदा करण्यात यावे, अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापि, तासिका तत्वावरील अध्यापकांना नियमानुसार देय होणारे मानधन एचटीई सेवार्थ प्रणालीमार्फत अदा करण्यासाठी सदर प्रणालीमध्ये सुधारणा प्रस्तावित असल्याने तोपर्यंत मानधन ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास दिनांक ०९/१२/२०१९ रोजीच्या शासन पत्रान्वये परवानगी देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, दिनांक २२/१०/२०२१ अन्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाचे मानधनाचे दरात वाढ करण्यात आली आहे. सदर सुधारित दरानुसार मानधन अदा करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील बहुतांशी गावांमध्ये अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत निश्चित केलेल्या मानकांची पॅकेज ड्रिकींग वॉटरसाठी अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(३१) * १७२०५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १५२०७ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील बहुतांशी गावांमध्ये अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत नियम व नियमने २०११ नुसार पॅकेज ड्रिकींग वॉटरसाठी नियमन २.१०.८ अन्वये मानके निश्चित करण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत नियम व नियमने २०११ नुसार अंमलबजावणी होत नसल्याने जनतेस अशुध्द व प्रक्रिया न करताच पाण्याची विक्री करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अशुध्द पाण्यामुळे जनतेच्या जिवास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याबाबत परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी प्रधान सचिव, अन्न व औषधी प्रशासन यांचेकडे माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०२३ वा त्यादरम्यान लेखी तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या सदर पाणी विक्रेत्यांना व उत्पादकांना अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी पाठीशी घालत असून जनतेस शुध्द पाणी मिळावे याबाबत प्रधान सचिव, अन्न व औषधी प्रशासन यांच्या स्तरावरून कोणती मोहिम हाती घेण्यात आली आहे, याबाबत जिल्हानिहाय सविस्तर थोडक्यात माहिती काय आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशुध्द व प्रक्रिया न करताच पाण्याची विक्री करण्याऱ्या संबंधित दोषी उत्पादकांवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अशुध्द पाण्यामुळे जनतेच्या जीवास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याबाबतची परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांची जानेवारी-फेब्रुवारी, २०२३ वा त्यादरम्यानची लेखी तक्रार सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्याकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(४) अन्न सुरक्षा व मानके या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या सदर पाणी विक्रेत्यांना व उत्पादकांना अन्न औषध प्रशासनाचे अधिकारी पाठीशी घालत आहेत, ही बाब खरी नाही. जनतेस शुध्द पाणी मिळावे यासंदर्भात अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ व नियम २०११ नुसार राज्यात अन्न व औषध प्रशासनाकडून वेळोवेळी तपासण्या करून, अशुध्द पाणी विक्री करणाऱ्यांविरुध्द कारवाया केल्या जात आहेत.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्याबाबत

**(३२) * १७८१७ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात चंद्रपूर जिल्ह्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्यासाठी विविध शिक्षक संघटनांनी दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी पासून चिमूर पंचायत समितीच्या अंतर्गत बेमुदत साखळी उपोषण करण्याचा इशारा दिला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सन २०२१-२०२२ मधील आयकर कपात रकमेतील तफावत दूर करून, चुकीचे पॅन नंबर अद्ययावत करण्यात यावे, गहाळ मासिक आयकर रक्कम जमा करण्यात यावी, प्रशासनाच्या चुकीमुळे आयकर रक्कम विलंबामुळे शिक्षकावर येणारे अतिरिक्त व्याज प्रशासनाने भरावे, डीसीपीएस धारक

शिक्षकांच्या खात्यावर डीसीपीएस रक्कम जमा करण्यात यावी, शिक्षकांचे सेवा पुस्तक, वरिष्ठ वेतन श्रेणी, आदर्श शिक्षक पुरस्कार पडताळणीसाठी जिल्हा परिषदेला पाठविण्यात यावे, शिक्षकांचे सेवा पुस्तक अद्ययावत करण्यासाठी शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, पतसंस्था, एलआयसी, जीपीएफ यांची कपात नियमित पाठविण्यात यावे, सेवानिवृत्त शिक्षकांचे उपदान अंश राशीकरण व सातव्या वेतन आयोगाचा हप्ता देण्यात यावा, अंशराशीकारण रकमेचा लाभ न देता हप्ता कपात करू नये, यासह इतर मागण्यांचे निवेदन, तहसिलदार, चिमूर यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षकांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही/ उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तहसिलदार, चिमूर यांचेकडे निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, चिमूर यांचेकडे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) मागण्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) लागू नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानातून दिल्या जाणाऱ्या धान्याचा अपहार झाल्याबाबत

**(३३) * १८०५० श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानातून माहे नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांच्या कोट्यातील ९८ हजार २८३ क्विंटल धान्याचा अपहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर स्वस्त धान्य दुकानातून माहे नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांच्या कोट्यातील ९८ हजार २८३ क्विंटल धान्याचा अपहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देव्हाळा (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील एमआयडीसीमध्ये उद्योग उभारण्यात आले नसल्याबाबत

**(३४) * १८१२३ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तुमसर (जि.भंडारा) – गोंदिया या राष्ट्रीय महामार्गावरील देव्हाळा येथे तीस वर्षांपूर्वी एमआयडीसीची स्थापना करण्यात येऊनही अद्याप संपूर्ण उद्योग उभारण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसीतील भूखंड घेतल्यानंतर उद्योजकांनी तीन वर्षात उद्योग स्थापन केले नसल्यामुळे या परिसरातील बेरोजगारीचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एमआयडीसीतील भूखंड घेतल्यानंतर तीन वर्षात उद्योग स्थापन न केलेल्या उद्योजकांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यामध्ये मौजे देव्हाळा येथे तुमसर लघु औद्योगिक क्षेत्राची स्थापना सन १९८९ मध्ये केली असून, भूखंड वाटपाची कार्यवाही सन- १९९२ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

सदर औद्योगिक क्षेत्रासाठी मऔवि अधिनियम, १९६१ च्या तरतूदीनुसार एकूण १०.३१ हे.आर खाजगी क्षेत्र संपादित केले आहे. त्यापैकी सदर क्षेत्रावर २४ भूखंड आरेखन करुन गरजू उद्योजकास वाटप केलेले आहेत. २४ भूखंडांपैकी १४ भूखंडांवर उत्पादन सुरु असून ८ भूखंडावर उत्पादन बंद आहेत. तसेच १ भूखंडावर बांधकाम सुरु आहे. तर, १ भूखंड उद्योजकास वाटप केला असून सदर भूखंड मोकळा असल्यामुळे मऔवि महामंडळाचे धोरणानुसार भूखंड ताब्यात घेणेची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सद्य:स्थितीत मऔवि महामंडळाच्या धोरणानुसार उद्योजकास वाटप केलेल्या एका भूखंडाबाबत भूखंडाचा विकास कालावधी संपुष्टात आल्यामुळे व भूखंडावर विकासात्मक कामे न केल्यामुळे भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना शासकीय व निमशासकीय सेवेत सामावून घेणेबाबत

**(३५) * १७४७५ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय आणि मानव विकास अंतर्गत कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना शिक्षकांचा दर्जा देऊन शासकीय व निमशासकीय सेवेत कायम करून नियमित वेतन देण्याची संबंधित संघटनांकडून सातत्याने मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना शासकीय व निमशासकीय सेवेत कायम करून नियमित वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच त्याबाबतची वस्तुस्थिती, कामाचे स्वरूप यांचा तपशील व याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियुक्त्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद सेवा नियमावली १९९४ नुसार कंत्राटीतत्वावर करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना शासकीय सेवेत कायम करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

तसेच मानव विकास कार्यक्रम हा अस्थायी स्वरूपाचा आहे.

-----------------

## राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५२ अक्कलकोट ते नळदुर्ग या रस्त्याचे काम भुसंपादनातील दिरंगाईमुळे प्रलंबित असल्याबाबत

**(३६) * १७५३६ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५२-अक्कलकोट ते नळदुर्ग या ४० कि.मी.च्या रस्त्याचे काम भुसंपादनातील दिरंगाईमुळे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गावरील १८० शेतकऱ्यांची १५० एकर जमीन मोबदला न देता या रस्त्यासाठी बेकायदेशीर पध्दतीने ताब्यात घेण्यात आली असून भूमि अभिलेख विभागाकडे संबंधित रस्त्याची नोंद दर्शविण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांनी सदर जमिनीबाबत कायदेशीर पध्दतीचा मार्ग अवलंबावा अशी मागणी केली असता त्यांच्यावर सरकारी कामात अडथळा आणला असे आरोप ठेवून पोलिसांच्या मदतीने शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात अक्कलकोट व तुळजापूर तालुक्यातील ग्रामस्थांनी आंदोलन केले असून मा.न्यायालयाने याप्रकरणी लक्ष घालून सोलापूर आणि उस्मानाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून या शेतकऱ्यांना जमिनीच्या कायद्याप्रमाणे व्याजासह योग्य तो मोबदला मिळवून देण्यात यावा, असे आदेश दिले असूनही अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला प्राप्त झालेला नाही हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अक्कलकोट-नळदुर्ग रस्त्याच्या कामात १८० शेतकऱ्यांच्या १५० एकर जमिनीचा मोबदला देण्याबाबत दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच भुसंपादनाबाबतचा प्रश्न सोडवून सदर रस्त्याचे प्रलंबित असलेले काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) नाही.

(२) नाही.

(३) सदर प्रकल्पाचे काम उपलब्ध शासकीय वहिवाटीच्या हद्दीमध्ये करण्यात आले आहे. तथापि, काही शेतकऱ्यांनी कायदा हातात घेऊन बळाचा वापर केल्याने व दमदाटीने काम बंद पाडण्याचे प्रकार घडल्याने अशा शेतकऱ्यांवर सरकारी कामात अडथळा आणल्याचे आरोप ठेवून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) व (५) मा.उच्च न्यायालयाने रस्त्याची रुंदी ठरविण्याचा वाद मिटविण्यासाठी मा.जिल्हाधिकारी सोलापूर तसेच उस्मानाबाद यांच्या देखरेखीखाली विहित मार्गाने संयुक्त मोजणी करणेबाबत आदेश देऊन आवश्यकता असल्यास भुसंपादन कार्यवाही करणेबाबत आदेशित केले होते. संयुक्त मोजणी प्रक्रीया पूर्ण करण्यात आलेली असून प्राप्त संयुक्त मोजणी अहवालानुसार भुमिअभिलेख खात्याने अस्तित्वातील रस्त्याची रुंदी व त्याचे क्षेत्रफळ वजा न करता संपूर्ण क्षेत्रफळ भुसंपादनासाठी प्रस्तावित केले आहे.

वाढीव क्षेत्राच्या भुसंपादनाबाबतचे अधिकार रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या अखत्यारित असल्याने त्याबाबत निर्णय घेण्यासाठी त्यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथील बंधाऱ्याच्या कामाची संबंधित ठेकेदाराकडून सुरुवात न केल्याबाबत

**(३७)** * **१६९९० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील समुद्रकिनारी कोळीवाडा ते जिल्हा पोलीस अधीक्षक बंगला या २०० मीटर बंधाऱ्याचे चार कोटी रुपयांचे काम दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ मध्ये मंजूर झाले असून सदर काम दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी पर्यंत एम.इ.सी. कन्सल्टंट या ठेकेदार कंपनीने पूर्ण करून द्यायचे होते परंतु मुदत संपली असतानाही बंधाऱ्याचे काम अद्याप सुरू करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळी हंगामात समुद्राच्या भरतीमुळे किनाऱ्यावर येणारे पाणी सभोवतालच्या नागरी परिसरात शिरुन नुकसान होत असून सध्या बांधलेला बंधारा हा लाटांनी आणि वादळाने पूर्णतः तुटलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुपये ४ कोटी नऊ लाख ५९ हजार ७७३.६८ एवढया रकमेच्या बंधाऱ्याच्या कामाची मंजुरी मिळूनही अलिबाग समुद्रकिनाराच्या बंधाऱ्याचे काम ठेकेदाराच्या कामचुकारपणामुळे आणि बंदर विभागाच्या दुर्लक्षामुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बंधाऱ्याचे बांधकाम विहित मुदतीत पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत तसेच बंधाऱ्याचे काम काम लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही.
(४) सदर कामास दिनांक १४/०२/२०२३ रोजी पर्यावरण विभागाची परवानगी मिळाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गावरील पनवेल ते इंदापूर पर्यंतच्या महामार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३८) * १७९०६ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पनवेल – इंदापूर या पहिल्या टप्प्यातील अर्धे काम पूर्ण केल्याचा कागदोपत्री दावा करणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणावर (एन.एच.आय.) मा.मुंबई उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गावरील पनवेल ते इंदापूर पर्यंतच्या सदर पहिल्या टप्प्याचे बांधकाम पूर्ण करण्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचआय) अयशस्वी ठरले असून सदर रस्त्यांवर खड्डे पडल्यामुळे रस्त्यांची दुरवस्था झाल्याने अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सदर मार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम व अपघाताचे प्रमाण कमी करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली तसेच महामार्गावरील खड्डे बुजविण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

सदरील लांबीतील मुख्य रस्ता हा सुस्थितीत असून वाहतूकीसाठी योग्य आहे व सेवा रस्ते काही ठिकाणी खराब असून सदरील सेवा रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम नेमणूक दिनांक घोषित केल्यानंतर करण्यात येईल.

(३) पनवेल ते इंदापूर ८४ कि.मी. महामार्गाची लांबी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येते. सदर लांबीतील चौपदरीकरणासाठी बी.ओ.टी तत्वावर नेमलेल्या सवलतदारास टर्मिनेट केल्यानंतर सदर सवलतदार यांनी मा.उच्च न्यायालय, दिल्ली येथे आव्हान दिले होते. त्या दाव्यास मा.उच्च न्यायालयाने खारीज केले.

पनवेल ते कासु या लांबीसाठी काँक्रीटीकरण करण्याच्या कामाची निविदा स्विकृत झाली असून नेमणूक दिनांक घोषित करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. कासु ते इंदापूर लांबीसाठी सिमेंट काँक्रीटीकरणाचे चौपदरीकरणाच्या कामास नोव्हेंबर २०२२ मध्ये कंत्राटदारास कार्यारंभ आदेश दिलेला आहे व लवकरच काँक्रीटीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे. तसेच ज्या ठिकाणी रस्ता खराब आहे त्याठिकाणी डांबरीकरणाने दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील काजूपाडा, गावदेवी रोड, कांदिवली येथे भेसळयुक्त दुधाचा साठा जप्त करण्यात आल्याबाबत

**(३९)** * **१७८९५ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील काजूपाडा, गावदेवी रोड, कांदिवली (पूर्व) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोयसर परिसरातील बिहारी टेकडी सोसायटी येथून रुपये ६२ हजार किंमतीचे १०६४ लिटर भेसळयुक्त दुधाचे साठे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास समतानगर पोलिसांनी व अन्न आणि औषध प्रशासनाच्या विभागाने कारवाई करुन जप्त केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,गोकुळ आणि अमुल सारख्या नामांकित कंपनीच्या दुधात भेसळ करून सदरहू भेसळयुक्त दुध हॉटेल्स आणि उच्चभ्रू सोसायट्यांना वितरीत करण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,चौकशीत काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने दुध भेसळ प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली असून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच दुधात भेसळ होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदरहू दूध उच्चभ्रू सोसायट्यांना वितरीत करण्यात येत असल्याचे पोलीस तपासात निदर्शनास आले आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस प्रशासनाने ०५ इसमांविरुध्द समतानगर पोलीस ठाणे, कांदिवली (पूर्व) येथे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ०५ आरोपींना पोलिसांमार्फत अटक करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी संबंधितांवर पोलीस प्रशासनामार्फत न्यायालयीन कार्यवाही घेण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणी दुधाचे एकूण ०९ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून सदर नमुने अन्न विश्लेषक यांनी अप्रामाणित घोषित केले असून संबंधितांवर पोलीस प्रशासनामार्फत न्यायालयीन कार्यवाही घेण्यात येत आहे.

दुधात भेसळ होवू नये म्हणून अन्न व औषध प्रशासनामार्फत विविध ठिकाणी नियमित धाडी टाकून व नियमित दुधाचे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेवून प्राप्त विश्लेषणाच्या अहवालाचे अनुषंगाने कायदेशीर कार्यवाही संबंधितांवर घेण्यात येते.

बृहन्मुंबई विभागामध्ये दुधाच्या पिशव्या टेम्परिंग करून होणाऱ्या भेसळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी झोपडपट्टी मोहिम राबवून संबंधित व्यक्ती विरुध्द गुन्हे नोंदविले जातात. मुंबई शहरामध्ये येणारे दूध मानकाप्रमाणे आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी नाका मोहिम राबविण्यात येते. सदर नाका मोहिमेत दुधाची चाचणी त्याच ठिकाणी करून दूध कमी दर्जाचे आढळल्यास त्याची कायदेशीररित्या विल्हेवाट केली जाते. धाडी जप्तीची कारवाई घेऊन दूध भेसळीवर नियंत्रण ठेवण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक संवर्गातील ग्रंथपाल व शारिरिक शिक्षण संचालक पदांची भरती करणेबाबत

**(४०) * १८६३८ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक संवर्गातील ग्रंथपाल व शारिरिक शिक्षण संचालक यांच्या पदभरतीसाठी मा.संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी शासनास प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पदभरतीसाठी पात्र उमेदवार सातत्याने शासनाकडे अर्ज, विनंती, निवेदन, बैठका व आंदोलने करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावावर निर्णय घेवून प्राध्यापक संवर्गातील ग्रंथपाल व शारिरिक शिक्षण संचालक यांची पदभरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) उच्चस्तरीय सचिव समितीने मंजूर केलेल्या ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक पदांपैकी यापूर्वी नियुक्ती आदेश दिलेली पदे वगळता उर्वरित ग्रंथपाल-१२१ व शारिरीक शिक्षण संचालक-१०२ असे एकूण २२३ पदे भरण्यास दिलेली स्थगिती शिथिल करण्याबाबत वित्त विभागास विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत

**(४१) * १७१४० श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, श्री.एकनाथराव खडसे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १५६९४ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयांना नॅक मुल्यांकनामध्ये चांगला दर्जा प्राप्त व्हावा, यासाठी शासन प्रयत्नशील आहे तसेच मुलांना मिळणारे शिक्षण उच्च दर्जाचे असावे असा शासनाचा प्रयत्न आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राध्यापक पदभरतीबाबत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ ही शेवटची तारीख निश्चित केल्यानंतरही ना-हरकत प्रस्तावाला उच्च शिक्षण संचालकांकडून मान्यता दिली जात नसल्याचे माहे डिसेंबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राध्यापक पदभरती १२ वर्षांपासून सतत लांबलेली असल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयातील प्राध्यापक पदभरतीचे वारंवार निर्देश देऊनही पदभरती करण्यात येत नसल्याने अनेक नेट सेट, पीएच.डी. धारक प्राध्यापकांना तासिका तत्त्वावर आपली उपजीविका चालवावी लागत असल्याने उपासमारीची वेळ या प्राध्यापकावर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदानित उच्च शिक्षण संस्थांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे अनेक वर्षांपासून भरली नसल्याने रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेप्रमाणे राज्यातील प्राध्यापक पदभरती तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती तात्काळ करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) सद्य:स्थितीत सहायक प्राध्यापक पदभरतीस ना-हरकत प्रमाणपत्र मागणीचे प्रस्ताव स्वीकृत करण्याची कार्यवाही सुरु आहे. दिनांक २८/०२/२०२३ पर्यंत ८८० सहायक प्राध्यापक पदांच्या पदभरतीस ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

(३) पदभरती प्रक्रिया सुरू असल्याने हे खरे नाही.

(४) उच्चस्तरीय सचिव समितीने मंजूर केलेल्या ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक पदांपैकी यापूर्वी नियुक्ती आदेश दिलेली पदे वगळता उर्वरित ग्रंथपाल-१२१ व शारिरीक शिक्षण संचालक-१०२ असे एकूण २२३ पदे भरण्यास दिलेली स्थगिती शिथिल करण्याबाबत वित्त विभागास विनंती करण्यात आली आहे

(५) वर नमुद केल्याप्रमाणे पदभरतीची प्रक्रिया सुरू असून त्यासंदर्भात शासनाकडून पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत:- १. सहायक प्राध्यापक या संवर्गातील एकूण २०८८ पदांच्या पदभरतीस दिलेल्या मान्यतेस अनुसरून दिनांक ३०/१०/२०२२ पुर्वी ना-हरकत प्रमाणपत्रासाठी मागणीपत्र सादर करण्याच्या सूचना राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत.

२. ज्या महाविद्यालयाने उक्त कालमर्यादेत मागणी पत्र सादर न केल्यास त्यांना वाटप करण्यात आलेली पदे ज्या महाविद्यालयांनी NACC, A+ व A दर्जा प्राप्त केलेल्या महाविद्यालयांना शासन मान्यतेने वाटप करण्यात यावीत अश्या दिनांक ११/१०/२०२२ च्या पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागातील जाम (जि.वर्धा) ते वरोरा (जि.चंद्रपूर) रस्त्यावरील साखळी पुलाचे काम पूर्ण करुनही खरे ॲण्ड तारकुंडे इंफ्रास्ट्रक्चर कंपनीला वेळेवर रक्कम अदा न केल्याबाबत

**(४२) * १७२७६ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विभागातील जाम (जि.वर्धा) ते वरोरा (जि.चंद्रपूर) या रस्त्यावर साखळी पुलाचे काम खरे ॲण्ड तारकुंडे इंफ्रास्ट्रक्चर कंपनीला ऑक्टोबर, १९९७ ला देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या कंपनीने सदर पुलाचे बांधकाम ऑक्टोबर, १९९८ मध्ये रुपये २.२६ कोटीमध्ये बांधा, वापरा व हस्तांतरित करा या माध्यमातून पूर्ण केले असून त्यानुसार कंत्राटदाराला वेळेवर रक्कम अदा न केल्यामुळे लवाद नियुक्त केल्याने त्या लवादाने माहे मार्च, २००४ मध्ये रूपये ५ कोटी ७१ लाख आणि त्यावर २५ टक्के चक्रवाढ व्याज इतकी रक्कम देण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पासाठी व्याजासह एकूण किती रक्कम खरे ॲण्ड तारकुंडे इंफ्रास्ट्रक्चर कंपनीला देण्यात आली आणि दिरंगाईमुळे शासनाला इतक्या मोठ्या प्रमाणात आर्थिक बोजा सहन करावा लागला, त्याची जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्यावर निश्चित करण्यात आली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले
तद्नुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उद्योजकाने दाखल केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने एकल लवादकाची नियुक्ती करण्यात आली. सदर लवादाने मार्च, २००४ मध्ये ५ कोटी ७१ लक्ष रूपये आणि त्यावर २५ टक्के प्रतीमाह चक्रवाढ व्याज इतकी रक्कम देण्याचा निवाडा जाहीर केला.
(३) सदर प्रकरणी एकल लवादाने दिनांक ०४/०३/२००४ रोजी दिलेल्या निवाड्याबाबत मा.जिल्हा सत्र न्यायालयाने दिनांक १५/१२/२००६ रोजी शासनाचे अपील फेटाळले. या निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे लवाद व समेट अधिनियम,१९९६ च्या तरतुदी प्रमाणे अपील दाखल करण्यात आले. मा.उच्च न्यायालयानेही अपील फेटाळल्याने सा. बां विभागातर्फे विधी व न्याय विभागाच्या सहमतीने विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. सदरहू याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०१/१२/२०२१ रोजी फेटाळली.

सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार परिगणीत होणारी दाव्याची रक्कम रुपये ५३६.७५ कोटी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने संबंधित उद्योजकास अदा करण्यात आली आहे.
(४) सदर प्रकरणी जाचक निविदा अटी व शर्ती सवलत करारनाम्यात समाविष्ट केल्याबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत मुख्य अभियंता, नागपूर यांना कळविण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त होताच अहवालातील निष्कर्षाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता विविध ठिकाणी वसतिगृहे सुरू करणेबाबत

**(४३) * १७१८० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ४८१४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता राज्यातील विविध ठिकाणी वसतिगृहे सुरू करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यात जिल्हानिहाय सदरील वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा व तालुका स्तरावर अशी वसतिगृहे सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शासन निर्णय दिनांक ०३/०७/१९७३ अन्वये राज्यातील १० ठिकाणी व शासन निर्णय दिनांक ०२/०९/१९८२ अन्वये १ ठिकाणी अशा एकूण ११ ठिकाणी वसतिगृहे सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(२) व (३) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह योजनेतंर्गत मराठवाड्यातील बीड व नांदेड येथे वसतिगृह कार्यान्वित आहेत. तसेच शासन निर्णय दिनांक ३१/०७/१९९५ अन्वये राज्यात तालुक्याच्या ठिकाणी प्रियदर्शनी मुलींचे वसतिगृह योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत भोकरदन जि.जालना, कन्नड, जि.औरंगाबाद, आष्टी, जि.बीड, उस्मानाबाद, जि.उस्मानाबाद, किनवट, जि.नांदेड या मराठवाड्यातील तालुक्यांच्या ठिकाणी वसतिगृहे सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विविध शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांनी स्थलांतरण केल्याबाबत

**(४४) * १८४९५ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई परिसरात कोरोनामुळे घरातील कमावत्या व्यक्तींची नोकरी गेली, अनेकांचे व्यवसाय बुडाले त्यामुळे मुंबईत राहणे कठीण होऊन बसलेल्या अनेक कुटुंबियांनी मुंबई सोडल्याने मुंबईतील विविध शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांनी स्थलांतर केले असल्याचे तसेच शासनाने केलेल्या सर्वेक्षणात स्थलांतरीत मजुर किंवा कामगारांच्या ७२३ मुलांनी शाळा सोडल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या काळात राज्यातील १७,२९७ मुलांनी शाळा सोडल्या असून त्यात मजूरांच्या ७,८०६ मुलांचा समावेश आहे, याबाबतची आकडेवारी मुंबई शिक्षण उपसंचालक कार्यालयाने जाहीर केली असून मुंबई शिक्षण उपसंचालक कार्यालयाने सर्व्हे करताना कोणते निकष लावले आहेत याबाबतचा तपशील देण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शाळाबाह्य मुलांचा सर्व्हे करून पुरेशा प्रमाणात शैक्षणिक सुविधा तसेच शिक्षक उपलब्ध करून देण्यात येऊन या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ ते ५ डिसेंबर, २०२२ या कालावधीमध्ये हंगामी स्थलांतरीत मुलांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी राज्यात सर्वेक्षण घेण्यात आले, व माहीती संकलन कार्य सुरू आहे.

सदर सर्वेक्षणासाठी खालीलप्रमाणे निकष ठरविण्यात आले आहेत.

(१) स्थलांतरीत बालकांच्या बाबतीत मुख्यत: दोन प्रकारात वर्गीकरण करणे. (१. कुटुंबासोबत स्थलांतरीत होऊन जाणारी बालके आणि २. कुटुंबासोबत स्थलांतरीत होऊन येणारी बालके)

(२) सर्वेक्षणाची कार्यपध्दती, मार्गदर्शक सूचना व सामान्य प्रतिबंधात्मक उपाय

(३) सर्वेक्षणाच्या अंमलबजावणी यंत्रणा

(४) सर्वेक्षणाच्या कामाचे वेळापत्रक

(५) कार्यवाही करण्याची जबाबदारी

(६) विविध नियंत्रक कक्ष स्थापन करणे.

(३) सर्वेक्षणात आढळून आलेल्या बालकांना जवळच्या शाळेत दाखल करण्यात येत आहे. तसेच त्यांना शालेय स्तरावरील असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील धोकादायक पुलांची डागडुजी तथा पुनर्बांधणी करण्याबाबत

**(४५)** * **१६९३३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील एकूण ४० मोठ्या पुलांची राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम आणि जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या माध्यमातून सन २०२२ च्या पावसाळ्यापूर्वी पाहणी करण्यात आली असून या पाहणी मध्ये नऊ मोठे आणि चार लहान असे तब्बल तेरा पूल धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाहणीदरम्यान तालुक्यातील १३ पुलांची धोकादायक पूल म्हणून नोंद करण्यात आली असून दोन मोठ्या पुलांचे तर चार लहान पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे त्यापैकी चार लहान पुलांची नुकतीच नव्याने पुनर्बांधणी करण्यात आली असली तरी उर्वरित धोकादायक पूल आगामी पावसाळ्यात त्रासदायक ठरू शकतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पेण जिल्हापरिषदेच्या अखत्यारीतील नऊ पूल धोकादायक घोषित करण्यात आले आहेत त्यांच्या पुनर्बांधणीसाठी आणि डागडुजीसाठी रुपये पाच कोटी वीस लाख एवढा खर्च अपेक्षित असून यावर्षी पावसाळ्यापर्यंत सदर धोकादायक पुलांची बांधणी करणे अत्यंत आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर धोकादायक पुलांची डागडुजी तथा पुनर्बांधणी करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे व सदर पुलांची पुनर्बांधणी किती कालावधीत करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.

पेण तालुक्यात असलेल्या राष्ट्रीय महामार्गवर कोणतेही पूल धोकादायक स्थितीत नाहीत. तथापि, ग्रामविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार पेण जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेले १० पूल त्यांचे विभागाने केलेल्या पहाणीअंती नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले आहेत.
(२) जिल्हा परिषदेच्या एकूण १० पुलांपैकी २ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट केलेले असून त्यानुसार दुरुस्ती करण्याचे नियोजन आहे.
(३) अंशत: खरे आहे.

सदर १० पुलांची पुनर्बांधणी/दुरुस्ती आवश्यक असून त्यासाठी एकूण रुपये ५.४५ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.
(४) धोकादायक व नादुरुस्त पुलांची तांत्रिक पाहणी करण्यात आली असून निधी उपलब्धतेनुसार पुनर्बांधणी/ दुरुस्ती करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे व पालघर जिल्ह्यातील भिवंडी-वाडा-मनोर महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४६) * १७९०७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-वाडा-मनोर या महामार्गाचे काम गेल्या कित्येक वर्षांपासून प्रलंबित असल्याने प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गाचे काम सुप्रीम इन्फ्रा कंपनीने घेतले असून वाडा ते मनोर या रस्त्याचे काम बालाजी या सहाय्यक कंपनीने पूर्ण केले असून पिंजाळ व देहर्जे नदीवरील पूल व वन विभागाच्या हद्दीत असलेली रस्त्यांची कामे अपूर्ण आहेत, तसेच मुंबई–अहमदाबाद महामार्गाला जोडणाऱ्या सदरहू महामार्गावर दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ वाढत असून अनेक जागी दुभाजक, सूचनाफलक, खड्डे दुरुस्ती, गटारे अशी अनेक कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकेरी व अपूर्ण सूचना फलकांचा अभाव असल्याने हजारो अपघात या रस्त्यांवर झाले असून अनेकांचा मृत्यू झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची पाहणी करुन भिवंडी-वाडा-मनोर या महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) खाजगीकरणांतर्गत प्रकल्पात समाविष्ठ काही कामे, संबंधित उद्योजकाने आवश्यक परवानग्या प्राप्त करुन न घेतल्याने कार्यान्वित करता आली नाहीत हे खरे आहे.

सदरचा खाजगीकरणांतर्गत प्रकल्प दिनांक ११/१०/२०१९ रोजी खंडीत करण्यात आला असून, सदर रस्त्यावरील पथकर वसुली बंद करुन सदर रस्ता सा.बां.विभागाकडे हस्तांतरीत झाला आहे.

सदर रस्त्यावरील आवश्यक मजबुतीकरण, डांबरीकरण व देखभाल व दुरुस्तीची कामे सा.बां.विभागाकडून करण्यात आली असून सदर रस्ता सद्य:स्थितीत वाहतूकीकरिता सुस्थितीत आहे.
(३) हे खरे नाही, सदर रस्त्याच्या स्थितीमुळे अपघात झाल्याची नोंद संबंधित पोलीस स्टेशनला नाही.
(४) खाजगीकरणांतर्गत अपूर्ण राहिलेल्या कामांकरिता आवश्यक परवानग्या प्राप्त करुन कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत सदर रस्त्यावरील आवश्यक देखभाल व दुरुस्तीची कामे सा.बां.विभागाकडून करण्यात आली असून सदर रस्ता सद्य:स्थितीत वाहतूकीकरिता सुस्थितीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील डोंगरी, उमरखाडी आणि नळबाजार येथील दुकाने आणि गोडाऊनमधून गुटखा, सुगंधी तंबाखू आणि पानमसाला इ. साठा जप्त करण्यात आल्याबाबत

**(४७) * १८३५८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक १४११८ ला दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा बंदी असल्याने शेजारच्या परराज्यातून गुटखा छुप्या मार्गाने आणून त्याची साठवणूक आणि विक्री केली जात असल्याचे माहे जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील डोंगरी, उमरखाडी आणि नळबाजार येथील दुकाने आणि गोडाऊनवर छापे टाकून मुंबई पोलिसांच्या अंमलबजावणी कक्ष आणि खंडणी विरोधी पथकाने शासनाने बंदी घातलेला व अवैधरित्या साठा करून ठेवलेला गुटखा, सुगंधी तंबाखू आणि पानमसाला इत्यादीचा ७५ लाख रुपयांचा मुद्देमाल तसेच बोरीवली पोलिसांनी एका सोसायटीत छापा टाकून वेगवेगळया कंपनीचा सुमारे ९३ लाख किमतींचा गुटखा जप्त केल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी जप्त करण्यात आलेला साठा कोणकोणत्या कंपनीचा होता, तसेच अद्यापपर्यंत किती जणांना अटक करण्यात आली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणातील संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

मुंबई पोलीसांच्या अंमलबजावणी कक्ष, गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग व खंडणी विरोधी पथक यांचे समवेत अन्न व औषध प्रशासनातील अधिकारी यांनी एकत्रितपणे कारवाई करून मुंबईतील डोंगरी, उमरखाडी आणि नळबाजार येथे छापा टाकून प्रतिबंधित अन्नपदार्थाचा साठा ताब्यात घेतला.

सदर प्रकरणी बोरीवली येथे घेण्यात आलेली संपूर्ण कार्यवाही ही बोरीवली पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाने घेतलेली असून एकूण रुपये १२,५९,३३८/- इतक्या किमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त केला आहे.

(३) उक्त प्रकरणी जप्त करण्यात आलेला प्रतिबंधित अन्नपदार्थाचा साठा हा खालील एकूण २१ कंपनीचा होता. मे.दुर्गा ट्रेडिंग कंपनी (लखनौ), मे. व्हीसीटी प्रोडक्ट्स (अहमदाबाद), मे.वेल फ्रेगनान्स प्रा.लि. (कानपूर), मे.कायपेन प्रोडक्टस प्रा.लि. (फरिदाबाद), मे.मालवा पॅकेजिंग (राजस्थान), मे.डीएस चूइंग प्रोडक्टस एलएलपी (उत्तरप्रदेश), मे.धारमपाल सत्यपाल ली. (उत्तरप्रदेश), मे.मिराज प्रोडक्टस प्रा.ली. (राजस्थान), मे.केसरवाणी जर्दा भंडार (उत्तरप्रदेश), मे.प्रभात जर्दा फॅक्टरी (इंडिया), प्रा.लि. (उत्तरप्रदेश), मे.धरमपाल प्रेमचंद लिमिटेड (उत्तरप्रदेश), मे.विधार्थ इंडस्ट्रीज इंडिया प्रा.लि. (टुमकुर), मे.त्रिमूर्ति फ्रेग्नंसेस प्रा.ली.(हरियाणा), मे.एमपी एन्टरप्रायझेस, मे.जिरेनियम आरोमेडिक प्रा.लि., जोधपुर, मे.त्रिमूर्ति फ्रेग्नंसेस ॲण्ड फ्लेवर्स प्रा.ली. (दिल्ली), मे.काइपन पान प्रोडक्टस प्रा.लि. (भोपाल), मे.के वाय टोबॅको वर्क्स प्रा.लि. (गाझीयाबाद), मे.सोम ग्लोबल पान मसाला प्रा.लि. (नवी दिल्ली), मे.त्रिमूर्ति फ्रेग्नंसेस ॲण्ड फ्लेवर्स प्रा.लि. (दिल्ली), मे.सुगंधी संनुफ्फ किंग (पी),ली. (दिल्ली)

सदर प्रकरणी घेतलेल्या कारवाई मध्ये अद्यापपर्यंत एकूण ९ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. बोरीवली येथे घेण्यात आलेल्या प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या कारवाईत एकूण ५ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे.

(४) उक्त प्रकरणी मुंबईतील डोंगरी, उमरखाडी आणि नळबाजार या ठिकाणी जप्त करण्यात आलेला प्रतिबंधित अन्नपदार्थाचा साठा करणाऱ्या ९ इसमाविरुध्द डोंगरी पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा क्र. १६/२०२३, दिनांक २६/०१/२०२३ रोजी दाखल करण्यात आला असून पोलिसांमार्फत सदर प्रकरणी तपास सुरु आहे.

बोरीवली येथे घेण्यात आलेल्या प्रतिबंधित अन्नपदार्थाच्या कारवाईत बोरीवली पोलीस स्टेशन, मुंबई येथे ५ इसमाविरुध्द गुन्हा क्र. ५२/२०२३, दिनांक २०/०१/२०२३ रोजी दाखल करण्यात आला असून पोलिसांमार्फत सदर प्रकरणी तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.